# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ४१ /2020 दिनांक: २० / 03 /2020

## कोव्हीड- १९ आदेश

**बाहेर गावावरुन येणा-या सर्व प्रवाशांची तपासणी करणेबाबत**

वाचा - १. **प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १४ मार्च, २०२०**

२. **साथरोग अधिनियम,१८९७**

३. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड - १९ कोरोना विषाणू वर उपाययोजना **नियम-२०२०** नुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील **नियम क्र. ३** नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्‌भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्या अर्थी,** अकोला जिल्हयात सद्यस्थितीमध्ये विदेशातून 46 प्रवासी आलेले आहेत. या सर्वांची वैद्यकिय अधिकारी यांचे मार्फत तपासणी सुरु आहे. परंतू पुणे व मुंबई, नागपूर तसेच विविध राज्यातून मोठया प्रमाणात प्रवासी येत आहेत अशा प्रवाशांची सूध्दा तपासणी करण्यात यावी अशा प्रकारची मागणी होत आहे व या बाबत माझी खात्री झाली आहे.

**त्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ , साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** व महाराष्ट्र शासनाची दिनांक १४ मार्च २०२० चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला असे निर्देशीत करतो की,** अकोला जिल्हयामध्ये पुणे व मुंबई, नागपूर तसेच विविध राज्यातून आलेल्या प्रवाशांनी प्रथमतः शासकीय वैद्यकिय रुग्णालयामध्ये जावून आवश्यक तपासणी करणे आवश्यक करण्यात येत आहे.

आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला, जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी रेल्वे स्टेशन, अकोला , राज्य परिवहन बस स्थानक, अकोला व खाजगी लक्झरी बस स्थानक निमवाडी अकोला या ठिकाणी वैद्यकिय पथकाचे गठन करुन प्रवाशांची तपासणी करण्याकरिता आवश्यक ते नियोजन करावे. व केलेल्या नियोजनाबाबत या कार्यालयास तात्काळ कळवावे

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** अन्वये शिक्षापात्र असलेला *अपराध* केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक २० मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

यांना माहिती करिता सादर

४. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
५. **मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हा परिषद अकोला.
६. **आयुक्त महानगर पालिका,** अकोला अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
७. **आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला /जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, जिल्हा परिषद अकोला **यांनी रेल्वे स्टेशन, अकोला , राज्य परिवहन बस स्थानक, अकोला व खाजगी लक्झरी बस स्थानक निमवाडी अकोला या ठिकाणी वैद्यकिय पथकाचे गठन करुन प्रवाशांची तपासणी करण्याकरिता आवश्यक ते नियोजन करावे. व केलेल्या नियोजनाबाबत या कार्यालयास तात्काळ कळवावे.**
८. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी** -------------- सर्व.
९. **गटविकास अधिकारी/पोलीस निरिक्षक--------------------------- सर्व**
१०. **मुख्याधिकारी** ------------------------------------------ मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,** यांनी नगर परिषद / नगर पंचायत कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
११. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**